आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ नोव्हेंबर २०२६ - बुधवार

ठळक बातम्या

- विकसित भारत २०४७च्या प्रवासात आरोग्यसेवा आणि शिक्षण हे भारताचे दोन मुख्य आधारस्तंभ असायला हवे, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

- उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी समाजवादी पार्टीच्या ५ उमेदवारांची नावं जाहीर

- २०२०मधल्या दिल्ली दंगल प्रकरणी शर्जिल इमाम आणि उमर खालिद यांना अंतरिम जामीन द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

आणि

- भारतीय महिला हॉकी संघाची जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी झेप

<><><><><>

विकसित भारत २०४७च्या प्रवासात आरोग्यसेवा आणि शिक्षण हे भारताचे दोन मुख्य आधारस्तंभ असायला हवे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. ओडिशात भुवनेश्वर इथं डॉ. अभिन्न चंद्र होमिओपॅथिक रुग्णालयाने आयोजित केलेल्या परिषदेला आज त्या संबोधित करत होत्या. होमिओपॅथी उपचार पद्धतीची विश्वासार्हता वाढवण्यासाठी शास्त्रीय संशोधन, पुराव्यावर आधारित मूल्यमापन करण्याचं आवाहनही राष्ट्रपतींनी केलं.

<><><><><>

महिला सक्षमीकरणात शिक्षणाने महत्त्वाची भूमिका बजावली असून महिलांना कौशल्य, आत्मविश्वास, आणि संधी मिळवून देण्याची गरज असल्याचं प्रदिपादन उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन् यांनी केलं आहे. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'स्वयंसिद्धा - VIJAYA: A Journey of Empowerment through Education' या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. ही परिषद महाराष्ट्रात प्रथमच होत आहे.

उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन् आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. नागपूरच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर विमानतळावर राज्यपाल जिष्णू देव वर्मा, आदिवासी विकास मंत्री अशोक उइके आणि इतर मान्यवरांनी त्यांचं स्वागत केलं.

यवतमाळ इथं स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यासाठी देखील उपराष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात विरोधकांनी दुष्काळाच्या मुद्द्यावर राजकारण न करता शेतकऱ्यांच्या हितासाठी चर्चेला पुढं यावं, असं आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. नागपूर विमानतळावर आज ते वार्ताहरांशी बोलत होते. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी सरकार दर आठवड्याला बैठका घेत असून चाराटंचाई, कर्जमाफी, आणि सूक्ष्म पतपुरवठ्यासह विविध प्रश्नांवर त्यात चर्चा होते. काही शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळख क्रमांक नसल्यामुळे त्यांच्या खात्यात अद्याप ५ हजार रुपयांची मदत जमा झालेली नाही, असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. संबंधित शेतकऱ्यांनी या महिनाअखेरपर्यंत फार्मर आयडी काढून घ्यावा, असं त्यांनी सांगितलं.

नागपुरातल्या ड्रॅगन पॅलेसच्या विकासाकरता महसूल विभागाच्या अखत्यारीतली जागा नगरविकास विभागाला देण्याचा निर्णय शासनानं घेतला असून केंद्रानं रस्तेविकासाकरता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय औषध प्रयोगशाळेने गेल्या महिन्यात केलेल्या चाचण्यांमध्ये ३७ औषधांचे नमुने प्रमाणित दर्जाचे नसल्याचं आढळलं आहे. तर विविध राज्यांच्या औषध तपासणी प्रयोगशाळांनी केलेल्या चाचण्यांमध्ये २८७ औषधांचे नमुनेही निकृष्ट दर्जाचे असल्याचं जाहीर केलं आहे. या औषधांची यादी केंद्रीय औषध मानक नियमन संस्थेकडून संकेतस्थळावर प्रसिद्ध केली गेली आहे. निकृष्ट दर्जाची आणि बनावट औषधे शोधून ती बाजारातून काढून टाकण्यासाठी, राज्य नियामक संस्थांच्या सहकार्याने ही प्रक्रिया नियमितपणे राबवली जाते.

<><><><><>

भारत आणि नेपाळच्या सेनादलांचा संयुक्त सराव - सूर्य किरण आजपासून नेपाळमधे सुरु झाला. नेपाळ लष्कराच्या मध्य पूर्व विभागाचे प्रमुख अधिकारी मेजर जनरल पूर्णबहादुर

खत्री यांच्या हस्ते सरावाचं उद्घाटन झालं. येत्या ८ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या सरावात आपत्ती व्यवस्थापन, जंगलातली युद्धं आणि मानवतावादी मदत पोहोचवणं या विषयांवर भर देण्यात येणार आहे.

<><><><><>

उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी समाजवादी पार्टीनं ५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. एकीकडे कांग्रेसबरोबर पक्षाची जागावाटपावर अद्याप चर्चा सुरु आहे. भाजपाला निवडणुकी पराभूत करण्याची ऐतिहासिक संधी काँग्रेस आणि सपा पीडीए आघाडीला असल्याचा विश्वास सपाच्या समाजमाध्यमावर व्यक्त करण्यात आला आहे.

दोन्ही पक्षांच्या नेत्यांची काल एकेका मतदार संघावर तपशीलवार चर्चा झाली.

<><><><><>

ईशान्य दिल्लीत २०२० मध्ये झालेल्या दंगलींच्या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयानं शर्जील इमाम आणि उमर खालिद यांना सध्या अंतरिम जामीन देण्यास नकार दिला आहे. या दंगलींबद्दलच्या कथित कटाशी संबंधित 'यू ए पी ए' कायद्यांतर्गतच्या प्रकरणात, दिल्ली उच्च न्यायालयानं त्यांना जामीन नाकारला होता; या निर्णयाला त्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठानं दिल्ली पोलिसांना नोटीस बजावून त्यांचं म्हणणं मागितलं आहे. अंतरिम जामिनाच्या विनंतीवर विचार करण्यापूर्वी, न्यायालय पोलिसांचं म्हणणं ऐकून घेणार आहे. या प्रकरणावर सुनावणी करण्यासाठी तीन न्यायाधीशांचं खंडपीठ गठित करण्यासाठी, हे प्रकरण प्रशासकीय स्तरावर सरन्यायाधीशांसमोर ठेवण्यात यावं, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत.

<><><><><>

तमिळनाडूत मदुराई इथं पारंपरिक कार्तिक दीपप्रज्वलनासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी घेण्याचं सर्वोच्च न्यायालायने मान्य केलं आहे. मदुराई इथल्या तिरुपरांकुंद्रम डोंगरावरच्या दीपस्तंभावर कार्तिक पौर्णिमेला दीप प्रज्वलित करण्याची प्रथा असून त्याबाबतचा वाद न्यायप्रविष्ट आहे. यंदा ही प्रथा कडक सुरक्षाव्यवस्थेत पार पडली. मात्र यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा अवमान झाल्याचा आरोप करणारी याचिका न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या पीठासमोर दाखल झाली आहे.

<><><><><><>

जागतिक हॉकी क्रमवारीत भारताच्या महिला संघानं पाचवं स्थान पटकावलं आहे. मध्यप्रदेश महिला आशियाई विजेतेपद करंडक स्पर्धेत संघानं आजवरच्या सर्वोत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. कालच्या सामन्यात चीनचा ६ विरुद्ध २ गोलने पराभव करुन भारतीय महिला संघानं गुणतालिकेत १२ गुणांसह अव्वल स्थान मिळवलं आहे.

<><><><><><>

गोव्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा उत्सव साजरा करण्यासाठी आज इफ्फी महोत्सवात एका चित्ररथ मिरवणुकीचं आयोजन करण्यात आलं आहे. सेलिब्रेटिंग जॉय ऑफ सिनेमा या संकल्पनेवर आधारित ही मिरवणूक संध्याकाळी पाच वाजता पणजी इथल्या सांता मोनिका टुरिझम जेट्टीवरून सुरू होऊन कला अकादमी इथे संपेल. या मिरवणुकीत विविध चित्ररथ, शिमगोत्सवाच्या मिरवणुकीतले गट सहभागी होतील.

वेव्हज फिल्म बाजारच्या विसाव्या आवृत्तीची समाप्तीही आज एका सोहळ्यानं झाली. या सोहळ्यात चित्रपट वितरण, पटकथा लेखन अशा विविध क्षेत्रातल्या उदयोन्मुख प्रतिभावानांचा रोख अनुदान आणि विविध बक्षिसं देऊन गौरव करण्यात आला. पाच दिवस चाललेल्या या कार्यक्रमात भारत आणि जगभरातील चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक, गुंतवणूकदार आणि वितरक एकत्र आले होते.

<><><><><><>

भारताच्या गृहनिर्माण साहाय्य कार्यक्रमांतर्गत, श्रीलंकेत मळ्यातल्या कामगारांसाठी ३७ नवीन घरं बांधली जाणार आहेत. कलुतरा जिल्ह्यातल्या किरीवानाकेतिया आणि कोबोवेला इस्टेट्स इथं, या घरांच्या पायाभरणीचा कार्यक्रम झाला. त्यावेळी श्रीलंकेच्या सामुदायिक पायाभूत सुविधा मंत्री के. व्ही. समंथा विद्यारत्ने तसंच भारतीय उच्चायुक्तालयातले अधिकारी उपस्थित होते. बागायती क्षेत्रांत राहणाऱ्या कुटुंबांच्या राहणीमानात सुधारणा करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

<><><><><><>

सौदी अरेबियामध्ये रियाध इथं आर्थिक केंद्र असलेल्या एका इमारतीवर काल झालेल्या हल्ल्याचा, तसंच नागरी, आर्थिक आणि ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य केलं जात असल्याच्या घटनांचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. हे हल्ले नागरिकांसाठी धोका निर्माण

करत आहेत, तसंच ते सौदी अरेबियाच्या सार्वभौमत्वाचं उल्लंघन करतात आणि प्रादेशिक सुरक्षा आणि स्थिरतेला बाधा आणतात, असं परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. रियाध मधल्या हल्ल्यात दोन भारतीय जखमी झाल्याचं मंत्रालयानं नमूद केलं आहे. या प्रदेशात लवकरात लवकर शांतता आणि सामान्य स्थिती परत येईल, अशी आशा भारताने व्यक्त केली आहे.

//<><><><><><>//